# मुंबई विद्यापीठ

क्र.मावक./२९२ /२००१

## परिपत्रक

दिनांक : १८ ऑगष्ट. २००१

सर्व अधिष्ठाते मुंबई विद्यापीठाशी सलग्नित सर्व अशासकीय, खाजगी, वैद्यकीय, दंत, आयुर्वेद व तत्सम महाविद्यालये तसेच उपकुलसचिव आस्थापना विभाग, शिक्षक नियुक्ती विभाग, घटक महाविद्यालय/पदवी पूर्व, पदव्युत्तर, प्रबंध विभाग आणि विविध विद्यापीठ विभाग प्रमुख यांच्या माहिती व योग्यत्या कार्यवाहीसाठी रवाना.

कुलसचिवांकरिता

## महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण २००१/(१३३)विशी-४
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक १७ जुलै, २००१.

प्रति,
कुलसचिव,
सर्व विद्यापीठ.

विषय - शासकीय/निमशासकीय सेवामधील धनगर एन-टी (क)चा अनुशेष भरून काढण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयावरील पत्र क्र.संकीर्ण १९९००/प्र.क्र./१२०/इमाव-४ दिनांक एप्रिल, २००१ च्या पत्राची प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,
सही/-
( अ.मा. भट्टलवार )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्रमांक : संकीर्ण १९००/ प्र.क्र.
१३०/इमाव-४,
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा
विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : एप्रिल २००१.

प्रति,
उपसचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग.

विषय : शासकीय / निमशासकीय सेवांमधील धनगर (एन.टी.(क) )चा अनुशेष भरून काढण्याबाबत.

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक सीबीसी १४९४/ प्र.क्र. २३६/ मावक-५, दि. २५ मे, १९९० अन्वये शासनाने धनगर व तत्सम एकुण २१ जातीचा भटक्या जमाती (एन.टी.क) प्रवर्ग घोषित केला असून शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: बीसीसी १०९७/ प्र. क्र.६३/१६-ब, दि.१८ ऑक्टोबर, १९९७ अन्वये सदरहू प्रवर्गाकरीता शासकीय/निमशासकीय सेवेत सेवाप्रवेश व पदोन्नतीकरीता ३.५ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, त्यांनी खुद्द मंत्रालयीन आस्थापनेवरील तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख, महामंडळे तसेच अन्य तत्सम प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास ही बाब आणुन वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

सही/-
(शा.ना. धकाते)
उपसचिव महाराष्ट्र शासन.

प्रत माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१) कक्ष अधिकारी (इमाव-१,२,६),सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) संचालक विमुक्त जाती, भटक्या जमाती, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई
४) व्यवस्थापकीय संचालक, इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, मुंबई.

प्रत,
मा.मंत्री (वि.जा.भ.ज) यांचे खाजगी सचिव यांजकडे माहितीकरीता अग्रेषित.